वाचा : 1. मुख्याधिकारी, नगर परिषद कळमनुरी यांनी सादर केलेला अर्थसंकल्प जा.क्र.2016/838दि.14/07/2016.
2. नगर परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.397 दिनांक.29/07/2016.

7490

जा.क्र.2016/साशा/नपाप्र/कावी 1018
**जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली**
दिनांक :- 21 /12/2016

**आदेश**

महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101(4) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन **मी, अनिल भंडारी, जिल्हाधिकारी, हिंगोली** मुख्याधिकारी नगर परिषद कळमनुरी यांनी सादर केलेला सन 2016 - 17 या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास खालील अटीवर मान्यता देत आहे.

**अटी**

1. कळमनुरी नगर परिषदेने कर्जाची सविस्तर नोंदवहीत नोंद घेऊन जास्तीत जास्त कर्ज परतफेड बाबत उपाय योजना करावी.
2. महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाची थकित रक्कम अदा करणेसाठी जास्तीत जास्त तरतूद करुन थकबाकी भरणा करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
3. महाराष्ट्र विद्युत मंडळ, बिगर सिंचन पाणी पट्टीची थकित रक्कम अदा करणेसाठी पुर्वविनियोजन व्दारे जास्तीत जास्त तरतूद करुन थकबाकी भरणा करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
4. वसुलीची टक्केवारी अत्यंत असमाधारकारक असल्यामुळे वसुलीची खास मोहिम राबवून वसुली 100% पुर्ण होईल याबाबत प्रयत्न करावे.
5. करापासुन एकही इमारत किंवा घर हे विना मालमत्ता कराचे राहु नये याची दक्षता घ्यावी.
6. समायोजित न केलेल्या अग्रीमाची रक्कम लेखासंहिता 1971 च्या नियमानुसार समायोजित करण्यात यावे.
7. जाहिरात खर्च, फर्निचर खरेदी, छपाई वरील खर्च, स्वागत समारंभ, प्रवास खर्च, सांस्कृतीक कामावरील खर्च, अनुदान, देणग्या इ.खर्चात काटकसर करावी.
8. मागासवर्गीय कल्याणकारी योजनांवर नियमान्वये तरतूद ठेऊन मागील अनुशेषासह आर्थिक वर्षात खर्च पुर्ण करावा.
9. महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी नियमान्वये तरतूद ठेऊन मागील अनुशेषासह आर्थिक वर्षात खर्च पुर्ण करावा.
10. देतन,राखीव निधी, पाणी पुरवठा राखीव निधी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विद्युत बिल इत्यादी बाबत नियमानुसार तरतूद ठेऊन राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव प्रमाणपत्र काढयात यावे.
11. अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार खर्च करतांना महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 आणि महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 तसेच स्थाई निर्देश,शासन निर्णया मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.
12. कळमनुरी,नगर परिषदेने निश्चित केलेल्या धोरणानुसार अनाधिकृत नळजोडणी तात्काळ बंद करावी व जनतेच्या आवश्यकते नुसार नियमान्वये नळजोडणी नियमित करावी.
13. वरिल सर्व बाबींचा काटेकोरपणे अमलबजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी सादर करावा.
14. शासन सुचना निर्देश व अनुदेयता व तसेच शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त होणारे शासन निर्णय,परिपत्रक व लेखाविषयकबाबी यांचा भंग,उल्लघन होणार नाही यांची दक्षता मुख्याधिकारी यांनी घावी. वरील अटीला अदिन राहुण सदर अर्थसंकल्पास मान्यता देण्यात येत आहे.

**(मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने.)**

स्वाक्षरित
जिल्हाधिकारी, हिंगोली
करिता

**प्रतिलिपी.**

1. मा.संचालक,नगर परिषद प्रशासन संचालनालय,शासकीय परीवहन सेवा इमारत,3 रा मजला सरपोच खानवाला मार्ग वरळी मुंबई - 30 यांना माहितीस्तव.
2. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
3. मा.अध्यक्ष, नगर परिषद,कळमनुरी यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव.
4. मुख्याधिकारी नगर परिषद कळमनुरी, यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव व अनुपालनास्तव.
5. एन.आय.सी.विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना प्रसिध्दीस्तव.

जिल्हाधिकारी, हिंगोली
करिता